This Question Paper consists of 37 questions 8 printed pages.
ह्या प्रश्नपत्रिकेत एकूण 37 प्रश्न आणि 8 छापील पाने आहेत.

**Code No.** कोड नं. **65/S/A/M**

Roll No. अनुक्रमांक | | | | | | | | | | | | |

**Set /** सेट **A**

# मराठी

## (204)

Day and Date of Examination (परीक्षेचा दिवस आणि तारीख) ..........................................

Signature of Invigilators (निरीक्षकाची सही) 1. ..........................................

2. ..........................................

***सामान्य अनुदेश :***

1. परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेच्या प्रथम पृष्ठावर आपला अनुक्रमांक लिहावा.
2. कृपाकरून प्रश्न–पत्र तपासून घ्या की पुस्तकाचे एकंदर पृष्ठ आणि प्रश्नांची संख्या प्रथम पृष्ठावर सर्वात वर छापलेली आहे, तेवढीच आहे किंवा नाही. तसेच प्रश्नांची संख्यापण क्रमिक रुपात असावी.
3. बहुपर्यायी प्रश्नांचे उत्तर देतांना तुम्हाला दिलेल्या पर्यायांतून योग्य तो पर्याय निवडावयाचा आहे. वेगळी देण्यांत येणाऱ्या उत्तर–पुस्तिकांमधे योग्य उत्तर लिहायचे आहे.
4. बहुपर्यायी प्रश्नांचे सोबतच सर्व प्रश्नांची उत्तरे निर्धारित वेळेतच द्यावयाची आहेत. बहुपर्यायी प्रश्नांसाठी जास्त वेळ देण्यांत येणार नाही.
5. उत्तर–पत्रिकेत ओळख निदर्शनास आणणे आणि योग्य जागेच्या व्यतिरिक्त अनुक्रमांक लिहिल्यास परीक्षार्थीला अयोग्य ठरविण्यांत येईल.
6. आपल्या उत्तर–पत्रिकांवर प्रश्न–पत्रिकेचा कोड संख्या 65/S/A/M सेट [A] लिहावेत.

# मराठी
## (204)

वेळ : 3 तास ]　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　[ एकूण गुण : 100

**निर्देश :** (i) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(ii) **सर्व** प्रश्न काळजीपूर्वक वाचून मगच उत्तरे लिहा.

(iii) प्रश्न **1** ते **11** पर्यंत प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडून लिहा.

**1.** ''ही माय _____ लाहो। बलसागर भारत होवो॥'' 1

(A) निजपदा
(B) भाग्यसूर्य
(C) ह्रदयास
(D) जगतास

**2.** ''आभाळागत माया तुझी आम्हांवरी राहू दे।'' या ओळीत वापरलेल्या अलंकाराचे नाव लिहा. 1

(A) उत्प्रेक्षा
(B) रूपक
(C) उपमा
(D) अनुप्रास

**3.** आईची मुलांपुरती जी भावना असते, तिला _____ म्हणतात. 1

(A) मातृदेवो भावना
(B) पितृदेवो भावना
(C) मातृशक्ती भावना
(D) सर्वोदय भावना

**4.** लग्नानंतर नागूला दिवसा झोप येत नसे कारण

(A) त्याला व्यायामाला वेळ दयावा लागत असे
(B) त्याच्यामागे प्रपंच लागला होता
(C) घरात मुलांचा गोंधळ चालू असे
(D) त्याची धाडसाची कामे वाढली होती 1

**5.** प्रत्येकजण पिल्लाशी कसा बोलत असे? 1

(A) टोचून (B) रागावून

(C) धिक्कारून (D) तुच्छतेने

**6.** वि. दा. सावरकर यांच्या आत्मचरित्राचे नाव कोणते? 1

(A) सहा सोनेरी पाने (B) मला काय त्याचे

(C) हिंदुत्व (D) माझी जन्मठेप

**7.** 'त्राण न राहणे' या वाक्प्रचाराचा अर्थ

(A) संयम न राहणे (B) उसंत न मिळणे

(C) शक्ती न राहणे (D) इच्छा न राहणे 1

**8.** हिंदुस्थानचा दक्षिण भाग कसा असेल असे लेखकाला वाटले होते? 1

(A) लहान (B) चिंचोळा

(C) विस्तीर्ण (D) चिमुकला

**9.** शेतकऱ्याला वारंवार कोर्टात जावे लागते. 'वारंवार' या शब्दास व्याकरणातील कोणते रूप म्हणतात? 1

(A) क्रियापद (B) विशेषण

(C) क्रियाविशेषण अव्यय (D) केवलप्रयोगी अव्यय

**10.** विष्णू वामन शिरवाडकर यांनी कोणत्या नावाने कवितालेखन केले? 1

(A) कुसुमाग्रज (B) केशवकुमार

(C) केशवसुत (D) कमलिनी

**11.** आता आभाळमुका घेणाऱ्या _____ सुरुंग लावलाच पाहिजे. 1

(A) पर्वतशिखरांना (B) हवेल्यांना

(C) झाडांना (D) इमारतींना

**12.** झेल्याचे पूर्ण नाव लिहा. 1

**13.** भाषेची अभिवृद्धी कशावर अवलंबून असते? 1

**14.** बालकवींच्या कवितेचे नाव लिहा. 1

**15.** 'बोनं' या शब्दाचा अर्थ सांगा. 1

**16.** ''वाचे बरवे कवित्व। कवित्वी बरवे रसिकत्व। रसिकत्वी परतत्त्व। स्पर्शु जैसा।''
यात वापरलेल्या छंदाचे नाव लिहा. 1

**17.** महर्षी अण्णासाहेब कर्वे यांनी कितव्या वर्षी आपला देह ठेवला? 1

**18.** घरावर मांजर बसले आहे, या वाक्यात 'वर' हे _____ अव्यय आहे. 1

**19.** 'तरास' या बोलीभाषेतील शब्दासाठी प्रमाण भाषेतील शब्द लिहा. 1

**20.** 'पर्वतशिखर' या पाठाचे लेखक कोण आहेत? 1

**21.** ''धरी धरोन _____ । समजोन करावें।'', ओळ पूर्ण करा. 1

**22.** 'महर्षींचे स्वर्गारोहण' हा लेख प्र. के. अत्रे यांनी कर्वे यांच्या मृत्यूनंतर लिहिला, अशा लेखास काय म्हणतात? 1

**23.** (अ) पुढील शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा. 2

*(i)* काहीच माहीत नसणारा

*(ii)* सत्याचा आग्रह धरणारा

(ब) पुढील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. 2

*(i)* सुगम

*(ii)* कृतज्ञ

*(iii)* खंड

*(iv)* सरस

**24.** खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :

महाराष्ट्रातील गरीब समाजामध्ये शिक्षणप्रसार करण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी एक उत्तम असा व्यवहार्य कार्यक्रम 'कमवा व शिका' राबविला. शहरी शिक्षणपद्धती... ग्रामीण भागात न पखडणारी, न रुचणारी त्यामुळे शैक्षणिक कार्याला शारीरिक श्रमाची जोड देण्याचे त्यांनी ठरविले. मुख्य म्हणजे पारंपरिक शिक्षणपद्धतीमध्ये शारीरिक कष्टाचे महत्त्व उरलेच नव्हते 'ज्ञानोपासना' आणि 'श्रम' हे जणू एकमेकांना बाधकच ठरत होते. तेव्य या कल्पनेला कर्मवीरांनी तडा दिला. ज्ञानप्राप्तीसाठी मोलाचे शारीरिक श्रम यांचा जर एकत्र कार्यक्रम ठरविला तर तो अधिक मोलाचा, यशस्वी होईल असा त्यांनी एक वेगळाच प्रयत्न केला.

**प्रश्न :–**

*(i)* कर्मवीर भाऊराव पाटील यांनी राबविलेल्या कार्यक्रमाचे नाव लिहा. 1

*(ii)* कोणते दोन शब्द एकमेकांना बाधक ठरत होते? 1

*(iii)* कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या वेगळ्या प्रयत्नाची वैशिष्ट्ये कोणती? 2

**25.** खालील पद्यांश वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा.

जे का रंजले गांजले। त्यासि म्हणे जो आपुले ।। १ ।।
तोचि साधू ओळखावा। देव तेथेचि जाणावा ।। २ ।।
मृदु सबाह्य नवनीत। जैसे सज्जनांचे चित्त ।। ३ ।।
ज्यासि अपंगिता नाही। त्यासि धरी जो हृदयी ।। ४ ।।
दया करणे जे पुत्रांसी। ते चि दासा आणि दासी ।। ५ ।।
तुका म्हणे सांगू किती। त्याचि भगवंताच्या मूर्ती ।। ६ ।।

**प्रश्न :–**

*(i)* संज्जनांचे चित्त कसे असते? 1

*(ii)* खरा साधू कसा ओळखावा? 1

*(iii)* 'भगवंताच्या मूर्ती' कोणास म्हटले आहे? 2

**26.** पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

(अ) कवी वि. दा. सावरकर यांना 'तो सोन्याचा दिवस' उगवल्यावर देशात कोणता बदल होईल असे वाटते? 2

(ब) मास्तरांच्या घरची कोणकोणती कामे झेल्या करीत असे? 2

**27.** (अ) चोर नागूकडून ट्रंकेची किल्ली का मिळवू शकला नाही? 2

(ब) घरधनीण सोने आणि माती दोन्ही पदरात घेते, असे कवी इंद्रजित भालेराव का म्हणतात? 2

**28.** (अ) महर्षी कर्वे यांच्या लोकविलक्षण व्यक्तिमत्त्वाचा परिचय लेखकाने कसा करून दिला आहे? 3

(ब) ''तू तर माझ्याही पुढे गेलीस'', असे ना. वा. टिळक का म्हणाले? 3

**29.** (अ) 'श्री' या अक्षरावर लेखकाचे प्रेम का आहे? 3

(ब) पावसाच्या धारा पृथ्वीवर पडल्यानंतर सृष्टीतील कोणकोणती रुपे कवी मंगेश पाडगावकर यांना मोहित करतात? 3

**30.** (अ) ज्ञानदेवांनी देवाकडे कोणते दान मागितले आहे? 3

(ब) डॉ. हेगडेवार हे जन्मजात देशभक्त होते, असे का म्हटले आहे? 3

**31.** (अ) भारताच्या अगदी दक्षिण टोकाला उभे राहिल्यानंतर लेखक गंगाधर गाडगीळ यांच्या मनात कोणते विचार आले? 3

(ब) 'त्याचेंच त्या कळालें-तो राजहंस एक' ही ओळ ससंदर्भ स्पष्ट करा. 3

**32.** तुमच्या गावात तुमचे शहरातील मित्र आले आहेत गाव दर्शनानंतर त्यांच्याशी झालेला संवाद तुमच्या शब्दांत लिहा. 4

**33.** खालीलपैकी **एका** विषयावर सुमारे *200* शब्दांत निबंध लिहा. 10

(1) विज्ञानयुगातील अंधश्रद्धा

(2) नववर्षाच्या स्वागताचा जल्लोष

(3) शेतकऱ्याचे मनोगत

(4) माणूस बोलणे विसरला तर...

**34.** या पाठ्यपुस्तकातील सर्वात अधिक कोणता पाठ तुम्हाला आवडतो? का? त्यापाठाचे नाव व लेखकाचे नाव लिहा. 4

**35.** तुमच्या मित्र/मैत्रीण परकीय भाषा पदविका अभ्यास-क्रमात उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाल्याबद्दल अभिनंदन पत्र लिहा. 8

**किंवा**

ध्वनिप्रदूषणामुळे होणाऱ्या त्रासाबद्दल महापालिका आयुक्तांना पत्र लिहा.

**36.** पुढील उताऱ्याचा **एक तृतीयांश** सारांश तुमच्या शब्दांत लिहा व उताऱ्यास योग्य शीर्षक द्या : 4

व्यापारी आणि औद्योगिक क्षेत्रात मराठी भाषेचा वापर मोठ्या प्रमाणावर अद्याप का होऊ शकत नाही आणि तो वापर करावयाचा झाल्यास मराठी भाषा ही अर्थव्यवहारात आणि वाणिज्यक्षेत्रांत कितपत सुलभतेने वापरता येईल ह्या प्रश्नासंबंधी अजूनही विवेचन करण्याची वेळ आपल्यावर येते. जगात औद्योगिक दृष्ट्या जे समृद्ध आणि प्रगत झालेले देश आहेत त्या देशांमध्ये त्या त्या लोकांची मातृभाषा अभिमानाने आणि सुलभतेने औद्योगिक आणि व्यापारी क्षेत्रांत वापरली जाते आणि त्यामुळे साहजिकच विश्वविद्यालयीन क्षेत्रांत वाणिज्य आणि औद्योगिक विद्याशाखांमधून त्या त्या देशातील मातृभाषेचा सुलभतेने आणि आवर्जून वापर केला जातो. उद्योग आणि व्यापार वाढवायचा असल्यास इंग्रजी भाषेचा वापर अपरिहार्य आहे आणि याउलट मराठी भाषा एक अडचण होऊन बसेल अशी जी एक समजूत आहे ती चुकीची आहे.

**37.** खालील माहितीच्या आधारे प्रवाह चार्ट तयार करा : 4

जमीन नांगरणे; मशागत करणे; पेरणी; तण काढणे; राखणी; कापणी; मळणी इ.

★ ★ ★